Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

www.sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ७७ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.१० डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# ग्रामपंचायतीचा सरपंच होऊन दाखव-छगन भुजबळ

## सरपंच होऊन मला जेलमध्ये जायचे नाही-मनोज जरांगे पाटील

इंदापूर-मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि ओबीसी नेते छगन भुजबळ यांच्यातील शाब्दिक युद्ध अद्यापही संपलेलं नाही. दोघेही वेगवेगळ्या जाहीर सभांमधून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करतात. एकमेकांच्या टीकेला प्रत्युत्तर देतात. त्यामुळे हे वातावरण अधिक तापण्याची शक्यता आहे. दरम्यान, आज (९ डिसेंबर) इंदापूर येथे झालेल्या सभेत छगन भुजबळांनी मनोज जरांगे पाटलांवर शरसंधान साधले. हिंदी भाषेसह त्यांच्या एकूण कार्यकौशल्यावर छगन भुजबळांनी टीका केला. त्या प्रत्येक टीकेवर मनोज जरांगेंनी प्रत्युत्तर दिलं आहे. त्यांनी आज माध्यमांशी संवाद साधला.मनोज जरांगे म्हणाले, आम्ही त्यांच्याविरोधात बोलायचं आणि नाव घेण्याचं बंद केलं आहे. रात्रंदिवस आम्ही कार्यक्रम घेत असलो तरीही सरकार आणि प्रशासनाचं जे काम शांतता राखण्याचं काम असतं ते आम्ही करतो. गरीब गावगाड्यातील लोक आताही आम्ही एकत्र आहोत. यांचं स्वप्न आहे की दंगल घडवून राजकीय फायदा उचलायचा.

परंतु, मराठा आरक्षण मिळेपर्यंत शांत राहा, कारण जातीय तेढ निर्माण होऊ नाही द्यायचा.नोंदी सापडलेल्या मराठ्यांच्या कुणबी दाखल्यांवर स्टे आणा अशी मागणी छगन भुजबळांनी केली. त्यावर मनोज जरांगे म्हणाले, दाखला दिल्यावर त्यावर स्टे आणता येत नाही. शासकीय नोंदी रद्द होत नसतात. त्या नोंदी रद्द केल्या तर सगळ्या नोंदी रद्द कराव्या लागतील. मंत्री झालात म्हणून कायद्याचा गैरवापर करत आहेत. हे स्वतः हॉटेले जाळतात आणि गरिबांना अडकवून गुन्हे दाखल करतात. परंतु, ते म्हणतात तसं नोंदी रद्द होणार नाहीत.मनोज जरांगेंनी सरकारला २४ डिसेंबरपर्यंतचा अल्टिमेटम दिला आहे. सध्या अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनातच मराठा कायदा पारित होईल, असा विश्वास जरांगेंनी व्यक्त केला. ते म्हणाले, अधिवेशन सुरू आहे. अधिवेशनातच मराठा आरक्षणाचा कायदा पारित होणार. २४ डिसेंबरपर्यंत वेळ घेतला आहे. त्याच्या आत आरक्षण मिळणार. कायदा पारित करायला आधार लागतो. शासकीय नोंदी मिळाल्या आहेत.



जर, आरक्षण मिळालं नाहीतर आम्ही लढायला सज्ज आहोत.मनोज जरांगे पाटील अकलेने दिव्यांग आहेत, अशी टीका छगन भुजबळांनी केली होती. त्यावर जरांगे म्हणाले, तुम्हाला माहितेय की कोण कमी आहे. ते अकलेने आमदार महापौर झाले नाहीत. तुम्हाला मराठ्यांना बसवलं पदावर. ज्यांनी ज्यांनी पदावर बसवलं त्यांना पायाखाली तुडवलं. त्याने शिवसेना मोडली, राष्ट्रवादी मोडली. अजून बऱ्याच गोष्टी मोडल्या. आमची मराठ्यांची जात मोडली, ओबीसींच्या जातीही मोडल्या. ओबीसी महामंडळातील ८० टक्के एकट्याने खालले आहे. तुला मोडायचाच नाद आहे. तुम्ही विकलांग आहात ते सगळ्यांना माहित आहेत. त्याला फक्त शब्दांचा खेळ करता येतो. धनगर बांधवांचा मोठा समुदाय असून त्यांच्या आरक्षणाबाबत तो भूमिका स्पष्ट करत नाही, असा आरोपही त्यांनी केला.मनोज जरांगेंचा १९८५ मध्ये त्याचा जन्म झाला. त्यावेळेला मी मुंबईचा महापौर आणि आमदार दोन्ही झालो. एक नाही दोन पदं भुषवली. मी देशाच्या महापौरांचा अध्यक्षही झालो. अरे तू ग्रामपंचायतीचा सरपंच होऊन दाखव, असं आव्हान छगन भुजबळांनी आज दिलं. त्यावर मनोज जरांगे म्हणाले, मला सरपंच व्हायचं नाही. तू तर जेलमध्येही जाऊन आलास. कारण तू तुझं पाप फेडत आहेस.आजच्या भाषणात छगन भुजबळांनी एका गाढवाचीही गोष्ट सांगितली. गाढवाला एवढ्या उंचीवर घेऊन गेलं कोण? आता सगळे डोक्याला हात लावून बसले याला कसं खाली काढायचं? अरे याला तुम्ही वरती नेलं तेव्हा काही बोलला नाहीत आता डोक्याला हात लावून बसले, असं छगन भुजबळ म्हणाले होते. त्यावर जरांगे म्हणाले, त्यांनी स्वतःलाच गाढवाची उपमा दिली. ते स्वतःलाच गाढव म्हणातात.

# बूथ अध्यक्ष नेतृत्व विकास अभियान शिबीर संपन्न

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुका कांग्रेस कमिटी च्या वतीने दिनांक ९ डिसेंबर रोज शनिवारला तालुका कांग्रेस कमिटी कार्यालय चिमूर येथे बूथ अध्यक्ष शिबीर नेतृत्व विकास अभियान (एल डी एम ) या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात बूथ अध्यक्षांना व कार्यकर्त्यांना विशेष मार्गदर्शन करण्यात आले.



या प्रसंगी प्रामुख्याने माजी मंत्री महाराष्ट्र राज्य तथा महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमिटी महासचिव माजी आ. डॉ. अविनाश वारजुकर, महासचिव महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमिटी डॉ. नामदेवराव किरसान, राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश तथा समन्व्यक चिमूर विधानसभा डॉ. सतिश वारजुकर, महाराष्ट्र प्रदेश ओबीसी संघटक धनराज मुंगले,कांग्रेस जेष्ठ नेते पंजाबराव गावंडे,सचिव महाराष्ट्र प्रदेश डॉ. नितीन कोडवते,शिबिराचे सयोजक विनोद बोरकर,सरचिटणीस जिल्हा कांग्रेस कमिटी माजी सदस्य जिल्हा परिषद सदस्य गजानन बुटके,तालुका अध्यक्ष सेवादल किशोर शिंगरे,तालुका अध्यक्ष चिमूर डॉ. विजय गावंडे, तालुका अध्यक्ष नागभीड प्रमोद चौधरी, तालुका सचिव चिमूर विजय डाबरे,सचिव तालुका नागभीड शरद सोनवाने,युवक अध्यक्ष चिमूर विधानसभा रोशन ढोक,चिमूर शहर अध्यक्ष अविनाश अगडे,माजी अध्यक्ष संजय घुटके,उपाध्यक्ष विनोद ढाकुनकर,ओम खैरे,जिल्हा उपाध्यक्ष सविता चौधरी, तालुका अध्यक्ष वनिता मगरे, माजी अध्यक्ष लता अगडे, तालुका कार्याध्यक्ष माधुरी रेवतकर, माजी सभापती लता पिसे,शहर कार्याध्यक्ष सीमा बुटके, भावना बावनकर, नर्मदा रामटेके,भावना पिसे, गिता रानडे,संपूर्ण कांग्रेस पदाधिकारी. कार्यकर्ते व तालुक्यातील बूथ अध्यक्ष उपस्थित होते.

# रामांजपूर येथील महेश गट्टू काटेबाईना या अपघात ग्रस्तांच्या कुटूंबाला राजे अम्ब्रिशराव आत्राम यांच्या कडून ४० हजाराची आर्थिक मदत

**गडचिरोली । प्रतिनिधी**

जिल्ह्याचे विकास पुरुष आणि दानशूर राजे म्हणून सुपरिचित,माजी राज्यमंत्री तथा माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम हे आपल्या क्षेत्रातील जनतेला नेहमीच मदतीचा हात देत असतात आणि आपल्या अहेरी विधानसभा मतदार संघातील गोर-गरीब व रोगाने ग्रासलेल्या आणि अडचणीत असलेल्या,अपघात ग्रस्त जनतेला नेहमीच आर्थिक मदत करीत असतात.त्यांनी आज सुध्दा सिरोंच्या तालुक्यातील जाणमपल्ली ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या रामांजपूर येथील महेश गट्टू काटेबाईना या अपघात ग्रस्तांच्या कुटूंबाला मदतीचा हात दिला.महेश गट्टू काटेबाईना वय-२० वर्षे,या युवकाचा काही दिवसांपूर्वी दुचाकी वाहनाने अपघात झाला.या अपघातात त्यांना जबर मार लागल्याने उपचार करण्यासाठी आर्थिक अडचण निर्माण झाली. काटेबाईना कुटुंब मोल मजुरी करून आपला उदरनिर्वाह करत असतो.परिस्थिती अत्यंत नाजूक असल्याने त्यांच्या कुटूंबात



आर्थिक समस्या निर्माण झाली होती.काटेबाईना कुटुंबाची ही आर्थिक समस्या राजे अंम्ब्रिशराव आत्राम यांच्या कार्यकर्त्यांनी लक्षात आणून दिली.त्यावेळी राजेंनी काटेबाईना यांच्या कुटूंबाला ४० हजार रुपये आर्थिक मदत केली. सर्वतोपरी पुन्हा सहकार्य करण्याचे आश्वासन महेश गट्टू काटेबाईना यांच्या कुटूंबाला कार्यकर्त्यांच्या माध्यमातून त्यांनी दिले.यावेळी भाजपचे कार्यकर्ते शंकर नरहरी,संपत दाया,शारुख पठाण,चंद्रशेखर चेम्मकारी,निखिल वेमुला,राजेश संतोषपू, शाम बेज्जनी,महेश जितबाईना,रामकृष्ण,रणजित बंडम,विशाल गाडीचेरला,अरविंद वेमुला हे उपस्थित होते.

## घरं मुकी झाली, संवादही संपला...

# आयांनो, कठोर होऊन निर्णय घ्या-कांचन गडकरी

**भंडारा । प्रतिनिधी**

आज घरातील संवाद बंद झाला आहे. घर मुकी झाली आहेत. सुसंस्कृत आणि सुदृढ पिढी घडविण्याचे स्वप्न पाहत असताना हे चित्र चिंतनीय आणि क्लेशदायी असे आहे. स्त्री आई म्हणून कुठेतरी कमी पडते आहे. सुदृढ सशक्त आणि समृद्ध राष्ट्राची सुरुवात ही घरापासून व्हावी आणि एक आईच हे आव्हान समर्थपणे पेलू शकते. तेव्हा आयांनो कठोर होऊन भूमिका घ्या, असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्या कांचन गडकरी यांनी केले.

महिला समन्वय विभागाच्या वतीने समर्पिता संगम या जिल्हास्तरीय महिला संमेलनाचे आयोजन भंडारा येथील शाळेच्या प्रांगणात केले होते. यावेळी प्रमुख वक्त्या म्हणून त्या बोलत होत्या. व्यासपीठावर महिला समन्वय विभागाच्या प्रांत संयोजिका मीरा कडबे, तुमसर उपविभागीय पोलिस अधिकारी रश्मीता राव, महिला समन्वय विभाग संयोजिका कांचन ठाकरे, जिल्हा संयोजिका दीपा नायर उपस्थित होत्या. दीप प्रज्वलनाने संमेलनाची सुरुवात झाली. प्रास्ताविकातून कांचन ठाकरे यांनी संमेलन आयोजना मागची भूमिका विशद केली. यावेळी उपस्थित हजारोच्या संख्येतील मातृशक्तीला संबोधित करताना, कांचन गडकरी भारतीय चिंतनात महिलांचा सहभाग वाढावा यासाठी सुरू असलेले प्रयत्न नक्कीच कौतुकास्पद आणि अभिनंदन आहेत. भारतीय व्यवस्थेत कुठेही स्त्री किंवा पुरुष प्रधान संस्कृती असा उल्लेख नाही. ही संस्कृती धर्मप्रधान आणि समाजाला पोषक असे अपेक्षित देणारी आहे. एका स्त्रीला आयुष्यात अनेक भूमिका वटवाव्या लागतात. एक स्त्री म्हणून आईची भूमिका अत्यंत महत्त्वाची आणि तेवढीच समाज घडविण्यासाठी पोषक असल्याचे त्या म्हणाल्या.आज स्त्रिया पुरुषांच्या सोबतीने प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर



आहेत. स्त्री-पुरुषांपेक्षा कधीच कनिष्ठ नाही. पण स्त्रीने स्वतःला स्त्री म्हणून स्वीकारणे गरजेचे आहे. तिने स्त्रीत्व कधीही सोडू नये असेही त्या म्हणाल्या. सृजनत्वाचे वरदान परमेश्वराने केवळ माती आणि स्त्रीला दिले आहे. जसे मातीतून काहीही उगवू शकते तसेच स्त्री ही एक सुदृढ संपन्न पिढी घडविण्याची क्षमता ठेवते. स्त्रीचे स्त्री तू हेच तिचे सत्व आहे, आणण्याचा प्रयत्न झाल्यास, तिची उन्नती होईल मात्र यातून विकृत स्त्री जन्माला येईल असेही कांचन गडकरी म्हणाल्या.आज समाजात घडणाऱ्या घटना पाहता आई म्हणून आपण संस्कार करायला कुठेतरी कमी पडतो असे वाटू लागले आहे. समाजात नवीन पीडित येणारे विकृत भावना का यावी, याचाही विचार होणे गरजेचे आहे. जिथे स्त्रीचा सन्मान केला जातो तसेच स्त्रियांवर अत्याचार होत असतील तर नक्कीच आई म्हणून आम्ही कमी पडतो आहे, याची जाणीव प्रत्येक स्त्रीने ठेवायला हवी. बदलत्या जगासोबत पाश्चिमात्य करण्याचा पगडा आमच्यावर पडला आहे, हे उघड आहे. मुला मुलींचा आईचा संपलेला संवाद विभक्त कुटुंब पद्धती या विकृत मानसिकतेला जन्मास घालत असल्याचे सांगताना आज घरे मुकी झाली आणि संवाद संपला अशी खंतही यावेळी त्यांनी व्यक्त केली. आई म्हणून कठोर भूमिका घेत कुटुंब जपा. संवादातूनच नातं घट्ट होईल त्यामुळे संवाद वाढवा असे कळकळीचे आवाहनही यावे कांचन गडकरी यांनी केले. दिवसभर चाललेल्या या संमेलनात विविध विषयांवर वेगवेगळ्या व्यक्तींकडून उद्बोधन करण्यात आले. संचालन शुभांगी ऋषी यांनी केले.

### आर्थिक संपन्न व्हा: राव

**जोपर्यंत आर्थिक स्वातंत्रता किंवा संपन्नता तुमच्या वाटला येणार नाही तोपर्यंत स्त्रीचे महत्त्व अधोरेखित होणार नाही. आर्थिक संपन्नता आल्यास निर्णय क्षमता आहे आपोआप तुमच्या हाती येते.**

**महिलांसमोर अनेक आव्हाने आहेत ती पेलण्यासाठी स्वतःच्या पायावर उभे होणे गरजेचे असल्याचे मत उपविभागीय पोलिस अधिकारी रश्मीता राव यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले.या वेळी प्रमुख अतिथी रश्मिता राव ए एस पी . तुमसर. वक्तृया कांचन गडकरी प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ता, प्रमुख अतिथी डॉ.विशाखा जिभकाटे,नेत्र चिकित्सक, भंडारा, वंदना खुशलानी प्राध्यापिका, शुभांगी मेंढे विश्व मांगल्य दक्षिण भारत संपर्कप्रमुख, परिणीता फुके ,नागपूर,विभाग संयोजिका कांचन ठाकरे, भंडारा विभाग पालक अर्चना डेहनकर, जिल्हा संयोजिका दीपा नायर, कल्याणी भुरे, भाजप महिला आघाडी जिल्हाध्यक्ष व जिल्ह्यातील मातृशक्ती उपस्थित होत्या.**

# नवभारत कन्या विद्यालयात दिव्यांग समता सप्ताह निमित्य कार्यक्रमाचे आयोजन



**मूल । प्रतिनिधी**

दिनांक ३ ते ९ डिसेंबर दिव्यांग समता सप्ताह समान संधी दिवसांचे औचित्य साधून नवभारत कन्या विद्यालयात विशेष गरजू धारक विद्यार्थांचा सत्कार करण्यात आला. यानिमित्त राकेश नखाते यांच्याकडून दिव्यांग विद्यार्थिनी करिता शाळेला वॉकर भेट दिली.

विद्यालयातील दिव्यांग विद्यार्थिनीचा मुख्याध्यापिका अल्का राजमलवार, विशेष शिक्षक इश्वर लोणबले, पर्यवेक्षक छत्रपती बारसागडे यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.दिव्यांग हे समाजाचा समान भाग आहे त्यामुळे समाजांनी दिव्यांगांना आपल्या सोबतच प्रगतीची संधी द्यावी असे आवाहन या निमित्ताने मुख्याध्यापिका राजमलवार यांनी केले.कार्यक्रमाचे संचालन विजय सिद्धावर यांनी तर आभार प्रदर्शन दिनेश जिड्डीवार यांनी मानले.

# शंकरपूर येथे संत जगनाडे महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

**शंकरपूर**-दिनांक ०८ डिसेंबर रोज शुक्रवारला सकाळी १० वाजता संताजी जगनाडे महाराज देवस्थान शंकरपूर येथे संताजी जगनाडे महाराज यांच्या ३९९ वी जयंती साजरी करण्यात आली त्या प्रसंगी उपस्थित संताजी जगनाडे महाराज देवस्थान चे अध्यक्ष व ग्रामपंचायत शंकरपूरचे उपसरपंच अशोक ज्ञानेश्वर चौधरी, संताजी तेली समाज मंडळ चे सदस्य बंडूजी भजनकर, रवींद्र राखडे, रवींद्र भजनकर, कैलास साहारे, सुनील दुरबुडे, किशोर समर्थ, माणिक चौधरी,



अनंता ठाकरे, चंद्रभान सहारे, मनोज चौधरी व समाज बांधव उपस्थित होते

सह्याद्रीचा राखणदार



संपादकीय

# लॉग आऊट, लॉग इन...

तंत्रज्ञानात कमालीच्या वेगाने होत असलेल्या स्थित्यंतरांबाबत सध्या दोन विचारप्रवाह असल्याचे स्पष्ट दिसते आहे. नवी अत्याधुनिक तांत्रिक साधने लवकरात लवकर बाजारात आणून त्यांचे व्यापारीकरण हा एक, तर नव्या तंत्रज्ञानातून उपस्थित होणाऱ्या प्रश्नांचा विचार करून मग पुढे जाणे, हा दुसरा. सॅम आल्टमन यांचे कंपनी सोडणे आणि त्यांची नाट्यमय वापसी यामागे या ताणाची पार्श्वभूमीही आहे.'चॅटजीपीटी' बनविणाऱ्या 'ओपनएआय' कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) सॅम आल्टमन यांना नोकरीवरून काढून टाकले आणि पाच दिवसांत परत बोलावले. आता ही बातमी एवढी महत्त्वाची का, असे अनेकांना वाटू शकते.अमेरिकेत असलेल्या कोण्या एका कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला (सीईओ) काढले काय किंवा परत घेतले काय, याच्याशी आपला काय संबंध? वरकरणी हे बरोबर वाटू शकते. पण खरे तर हा संबंध नक्कीच आहे.'ओपनएआय' ही अमेरिकेतील प्रख्यात कंपनी. या कंपनीचे 'सीईओ' सॅम आल्टमन आहेत. या कंपनीने एका वर्षांपासून जगात खूप मोठा बदल घडवून आणला आहे. त्यांनी बनवलेला प्रोग्राम – चॅटजीपीटी हा कृत्रिम बुद्धिमत्तेवर (आर्टिफिशिअल इंटेलिजन्सवर) आधारित आहे. हा प्रोग्रॅम माणसासारखा विचार करू शकतो, माणसासारखी उत्तरे देऊ शकतो, माणसासारखे निर्णय घेऊ शकतो.याची मेख अशी आहे की, तो जेवढ्यावेळा वापरला जातो, तेवढ्या प्रत्येकवेळेस त्यातून तो शिकत जातो. त्यामुळे जेवढे जास्त लोक याचा वापर करतील तेवढा तो जास्त सक्षम होत जातो. आत्ताच जगातील १०० कोटी माणसे याचा वापर करत आहेत. विचार करा की, तो एवढ्या लोकांकडून रोज वेगवेगळ्या गोष्टी शिकत आहे, म्हणजे त्याचा मूलभूत पाया आणि ज्ञान किती पक्के होत आहे. त्यामुळेच जी कामे खूप अभ्यास करून, उच्चशिक्षण घेऊन, ज्ञान व अनुभवानेच जमतात, ती कित्येक कामे 'चॅटजीपीटी' विनासायास अन् वेगाने करू शकतो.वेगाने होणाऱ्या ह्या सर्व बदलांवर सध्या दोन विचारप्रवाह ठळकपणे दिसतात. एक म्हणजे प्रवेगक (रललशश्रशीर्रीीी) आणि नियंत्रणात्मक (वशलशश्रशीर्रीीी). प्रवेगक म्हणजे नवनवीन साधने लवकरात लवकर बाजारात आणून त्याचे व्यापारीकरण करणे. नियंत्रणात्मक म्हणजे नवीन साधनांची उपयुक्तता आणि धोका आधी पडताळून पाहणे आणि त्याच्यावर नियंत्रण ठेऊनच ते बाजारात आणणे.'चॅटजीपीटी'चा फायदा आहे; पण त्याचा मनुष्याला असलेला धोका लक्षात घेऊन, याच सावध आणि नियंत्रणात्मक भूमिकेतून संचालक मंडळाच्या काही सदस्यांनी आल्टमन यांना बाहेरचा रस्ता दाखवला होता, असे सांगितले जाते. सॅम आल्टमन त्यांच्या भावी योजनांबद्दल पुरेशी माहिती सहकाऱ्यांना, संबंधितांना देत नव्हता, अशी तक्रार होती.'मायक्रोसॉफ्ट'ने 'ओपनआय' मध्ये नुकतीच एक अब्ज डॉलरची गुंतवणूक केली आहे. त्यामुळे मायक्रोसॉफ्टनी आपली शक्ती वापरून नवीन संचालक मंडळ आणून सॅम आल्टमनला पाचच दिवसात परत 'सीईओ'च्या जागी नियुक्त केले. पाच दिवसांपूर्वी पुन्हा सूत्रे घेतल्यानंतर संशोधनाचे काम आम्ही जोमाने सुरूच ठेवणार, असे त्यांनी सांगितले.यात अजून बऱ्याच घडामोडी झाल्या; पण थोडक्यात म्हणजे 'नियंत्रणात्मक' मानसिकतेला सध्या तरी माघार घ्यावी लागली आणि 'प्रवेगक विचारधारे'ला आघाडी मिळाली. यातून कंपन्या अद्यापही भांडवलदारी भूमिकेतूनच निर्णय घेत आहेत, हे दिसत आहे. याचा अर्थ कंपन्या मुद्दामून काही वाईट होईल, असे करण्याच्या मागे आहेत, असे नाही; पण ह्या स्पर्धेच्या काळात जिंकण्यासाठी मनुष्यजातीला मात्र पणाला लावले जात आहे.हे सर्व आपल्यापासून लांब, दुसऱ्या खंडात घडत असले तरीही याचा प्रभाव आपल्यावर लवकरच पडणार आहेच. या मोठ्या कंपन्या बाजरात काय आणत आहेत आणि आपण त्याला कसे सामोरे जाणार आहोत, हा एक वेगळा विषय आहे. आपण हे नक्कीच थांबवू शकणार नाही.आपली मूल्ये आणि तत्त्वे आपण जपली तरीही हे बदल आपल्याला स्वीकारावे लागतील. नवीन होणाऱ्या बदलाला सकारात्मक दृष्टिकोनातून पाहात वाट काढत राहणे महत्त्वाचे. मनुष्याने यंत्रांना बनवले आहे. यंत्र मनुष्यावर राज्य करतील हे माणसाला कधीच मान्य होणार नाही.यंत्रमानव प्रोग्रामप्रमाणेच काम करतात. त्यांना स्वतःची धारणा, स्वतःचा विवेक असा काही नसतो. त्यामुळे त्यांचा उपयोग ठरवलेल्या सुनिश्चित कामांसाठीच होतो. पण आता 'चॅटजीपीटी' हा माणसाच्या मेंदूसारखा काम करून स्वतः निर्णय घेऊ शकत असल्याने, चॅटजीपीटी आणि यंत्रमानव हे एकत्र आले तर 'चॅटजीपीटी'च्या नियंत्रणाखाली यंत्रमानवाला स्वतःची धारणा आणि अस्तित्व येऊ शकेल, अशी भीती आहे.त्यामुळे 'चॅटजीपीटी' दुधारी शस्त्रासारखे आहे. याचा उपयोग भरपूर चांगल्या आणि अवघड कामांसाठी होऊ शकेल. पण त्याच वेळेस याचा वापर नीट केला नाही, तर त्यामुळे फक्त माणसांचेच नाही, तर देशांचे स्वातंत्र्यही धोक्यात येऊ शकते. काही काळाने युद्ध झाले, तर निर्णय घेण्याची शक्ती असलेल्या यंत्रांमध्येच होतील. कुठलेही यंत्र हे शस्त्र म्हणून वापरता येऊ शकेल. त्यामुळे यावर नीट नियंत्रण ठेवले नाही, तर हे 'आर्टिफिशिअल इंटेलिजन्स'चं जग अत्यंत धोकादायक आहे.'चॅटजीपीटी' हा प्रोग्रॅम एका लहान बाळासारखा आहे. तो १०० कोटी वापरकर्त्यांकडून रोज खूप काही शिकत आहे. उदाहरणार्थ, डॉक्टर किंवा वकील त्याचा उपयोग एखाद्या परिस्थितीचे विश्लेषण करण्यासाठी वापरत आहेत, प्रवासाला जाणारे त्याच्याकडून त्यांची ट्रिप प्लॅन करून घेत आहेत, एखादा उद्योगपती 'चॅटजीपीटी' वापरून महत्त्वाचे निर्णय घेत आहे.पण त्याचवेळेस मजा म्हणून लोकांनी 'चॅटजीपीटी'ला तुरुंग कसे फोडायचे, बॉम्ब कसे बनवायचे, कोणाला कसे फसवायचे, असे प्रश्नही विचारत आहेत आणि त्याने त्याची उत्तरे लगेच दिलीसुद्धा आहेत. म्हणून तो जे काही शिकत आहे, त्यातील चांगले काय आणि वाईट काय ह्याच प्रोग्रॅमिंग करून ह्या बाळाला मूल्ये, नैतिकता आणि त्याच्या जबाबदाऱ्या शिकवण्याचे काम त्याचे आईवडील म्हणजे – त्याच्या कंपनीचे सीईओ, इतर व्यवस्थापक आणि बोर्ड मेंबर यांचे आहे.त्याला असे संस्कार देण्याची गरज आहे की, त्याला कोणीही अनैतिक किंवा बेकायदा व्यवहारांच्या संदर्भात प्रश्न किंवा निर्णय विचारला तर त्याला ते कळता कामा नये आणि त्याने कोणतेही उत्तर देता कामा नये. त्यामुळे कंपनीचे व्यवस्थापन हे त्याला शिकवतील, त्याप्रमाणेच हे बाळ जसे मोठे होईल, तसेच हे वागत जाणार आहे.निर्णय देताना, विश्लेषण करताना ह्या शिकवणीवरच ते यंत्र त्याचा परिणाम देणार आहे. म्हणूनच या कंपनीचे संचालकमंडळ आणि 'सीईओ'वर अत्यंत मोठी जबाबदारी आहे. मधल्या काळात फेसबुक, ट्विटर, लिंकड-इन, गुगल, मेझॉन या कंपन्यांनी संपूर्ण जगभरात सर्व माणसांचे आयुष्य पूर्णतः बदलून टाकले.ज्याप्रकारे आपण नोकरी करतो, काम करतो, पैसे कमवतो, गुंतवणूक करतो, समाजाशी मिळतो-भेटतो, गप्पा मारतो, सिनेमा बघतो, खातो-जेवतो, अभ्यास करतो, शिकतो, घरी राहतो – ह्या प्रत्येक गोष्टीमध्ये बदल झाला. एवढेच नाही तर माणसांचे विचार, मूलभूत गरजा, अपेक्षा, लग्न-मुले-कुटुंब ह्याच्या संकल्पनाच बदलल्या. आनंद, मजा, सुखदुःख, यश- अपयश ह्या सर्वांच्या व्याख्याच बदलल्या.उदाहरणार्थ लग्न होण्याचं प्रमाण कमी झालं, मुलं होण्याचे प्रमाण कमी झालं, आधी एकत्र कुटुंबपद्धती नंतर विभक्त कुटुंबपद्धती आली आणि आता तर कुटुंबपद्धती संपायच्याच मार्गावर आहे. नवीन पिढी एकेकटेच राहणे पसंत करताना दिसत आहेत. पूर्वी अनैसर्गिक समजले जाणारे समलिंगी लग्न, लिंगबदल, सरोगसी वगैरे सारख्या गोष्टींची स्वीकृती आपण आता सहज करू लागलो आहोत. जगाला बदलण्यात ह्या मोजक्या कंपन्यांचा मोठा हात आहे.या कंपन्यांची धोरणे आणि सामाजिक जबाबदारी ह्याचे निकष कोण लावणार, त्यांच्यावर वचक कोण ठेवणार? हे सर्व ज्या गतीने होत आहे ते समजून, त्यासाठी म्हणून लागणारे नियम आणि मान्यता कोण ठरवणार, लोकांची वैयक्तिक गोपनीयता, सुरक्षा उघड्यावर येण्याबद्दल त्यांना कोण जाब विचारणार, असे बरेच प्रश्न उभे रहातात. म्हणूनच युरोपातील देशांनी फेसबुकचे 'सीईओ' मार्क झुकरबर्ग यांच्यावर खटला चालवायचा प्रयत्न केला होता.पण ठोस नियम आणि धोरणांअभावी त्यातून हवा तसा परिणाम मिळाला नाही. अनेक देशांची सरकारे यावर काम करत आहेत; पण हे सर्व ज्या वेगाने होत आहे त्या वेगाने ते संपूर्ण देशाचे नियम आणि धोरणे बदलू शकत नाहीत. अजूनही हा विषय कंपन्यांच्याच हातात आहे.

# 'मिचॉन्ग'चा भयकंप

माणसाने विज्ञानाच्या अध्ययनातून संकटांवर मात करण्याची क्षमता मिळविली असली तरी वादळ, ज्वालामुखी, भूकंप आदी निसर्गकोपाला कवेत घेणे अद्याप साधलेले नाही. 'मिचॉन्ग'चा विद्धंस मोठा आहे. हे दु:ख छोटे नाही. बाधित गावांची स्थिती पूर्वपदावर येण्यासाठी अनेक वर्षे लागतील.'मिचॉन्ग' या चक्रीवादळाने चांगलाच दणका दिला आहे. चेन्नई विमानतळाची धावपट्टी पाण्याखाली गेली. अनेक उड्डाणे रद्द झाली. दक्षिणेतील रस्त्यांवरून नावा चालल्या. काही राज्यांतील १४४ रेल्वे गाड्या रद्द कराव्या लागल्या. वेगवेगळ्या घटनांमध्ये अनेक मृत्यू झाले. आंध्र प्रदेश, तामिळनाडू, ओडिशासह दक्षिण भारताला या वादळाचा जबर तडाखा बसला. बंगालच्या खाडीवर धडकलेले 'मिचॉन्ग' हे यंदाचे चौथे चक्रीवादळ. त्रास झाला, मात्र बचावकार्यातील सुसूत्रता दिलासादायक आहे.बंगालचा उपसागर आणि दक्षिण आंध्रच्या किनारपट्टीवरील चक्रीवादळ वेगाने उत्तरेकडे सरकले. ताशी ८० ते ९० किलोमीटर हवेचा वेग होता. उपाययोजनांसाठी पंतप्रधानांनी आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. गृहमंत्री तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांशी बोलले. केंद्राकडून मदतीची तयारी दर्शविली. वादळी आव्हान पेलण्यासाठी दिल्लीत कॅबिनेट सचिवांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन समितीची बैठक झाली.'मिचॉन्ग'चा फटका कमी करण्यासाठी राज्य सरकारे, केंद्रीय मंत्रालयांनी एकत्रितपणे कंबर कसली. भारतीय हवामान विभागाच्या महासंचालकांनीही समयोचित माहिती पुरवित नागरिकांना सचेत केले. मच्छीमारांना समुद्रात जाण्यापासून रोखण्यात आले. पुरेशा प्रमाणात निवारा, वीजपुरवठा, औषधे आणि आपत्कालीन सेवाही सज्ज होत्या. तरीही महापुराच्या भीतीने नागरिकांची गाळण उडाली.



संभाव्य धोका टाळण्यासाठी तामिळनाडू, आंध्र प्रदेश, ओडिशा आणि पुद्दुचेरीत बचाव पथके तयार आहेत.जहाजे आणि विमानांसह तटरक्षक दल, लष्कर आणि नौदलाच्या मदत आणि बचाव पथकांना सज्ज ठेवण्यात आले आहे. 'मिचॉन्ग'चा अर्थ होतो शक्ती आणि लवचिकता. हे नाव म्यानमारने ठेवले आहे. चक्रीवादळांचे नाव ठेवणारी एक संस्था आहे. त्यात भारत, बांगलादेश, पाकिस्तान यांच्यासहित १३ देश आहेत. चक्रीवादळ म्हणजे अत्यंत धोक्याच्या पातळीवर पसरणारे वायुमंडळ असते. पूर्वानुमान आणि पूर्वतयारीची साथसंगत कितीही काटेकोर, भक्कम राखण्याचा प्रयत्न केला तरी नैसर्गिक आपत्तींचा फटका थोपविता येत नाही हे 'मिचॉन्ग'ने सिद्ध केले.माणसाने विज्ञानाच्या अध्ययनातून संकटांवर मात करण्याची क्षमता मिळविली असली तरी वादळ, ज्वालामुखी, भूकंप आदी निसर्गकोपाला कवेत घेणे अद्याप साधलेले नाही. 'मिचॉन्ग'चा विद्धंस मोठा आहे. हे दु:ख छोटे नाही. बाधित गावांची स्थिती पूर्वपदावर येण्यासाठी अनेक वर्षे लागतील. समुद्रीकिनारा वेधक असतो आणि भेदकही. भविष्यातील वादळी आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी सध्यापेक्षाही सर्वंकष, शास्त्रशुद्ध उपाय हवेत, हाच बोध 'मिचॉन्ग'रुपी भयकंपाने पुन्हा दिला आहे.

# सुखावणारे अर्थचित्र


भारतीय अर्थव्यवस्थेने या आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत सगळ्या वित्तसंस्था आणि जगाच्याही अपेक्षा ओलांडून पुढे झेप घेतलेली दिसते. तीस नोव्हेंबरला सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी विभागाने दिलेल्या माहितीनुसार ३० सप्टेंबरला संपलेल्या दुसऱ्या तिमाहीत विकासाचा दर ७.६ नोंदविला आहे. हा जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांमधला उच्चांकी वेग आहे. तो भारतीय अर्थकारणातील चैतन्य, वाढीची ओढ आणि भारतीय ग्राहकांची सुस्थिती दाखविणारा आहे.बहुतेक अर्थतज्ज्ञांना वाढीचा वेग सात टक्क्यांच्या आसपास राहील, असे म्हटले होते. त्याहीपेक्षा विकासाचा दर अर्धा टक्क्याने जास्त असणे, हे मोठेच यश म्हणावे लागेल. भारत आणि चीन यांची नेहेमीच तुलना होते. याच तिमाहीतील चीनचा वेग केवळ ४.९ टक्के असल्याचे सांगितले जाते. यावरून भारताचे वर्तमान आणि उज्ज्वल भविष्य लक्षात येते. भारताचे उत्पादन क्षेत्र सेवा क्षेत्राच्या तुलनेत कमी पडते आहे, असे चित्र होते. यंदा ते बदलत आहे. या तिमाहीत चांगली वाढ नोंदवली आहे. तीच गोष्ट खाण उद्योगाची. यातून होणारी रोजगारांची वाढ महत्त्वाची असते आणि ती पुढे एकूण मागणीवर चांगला परिणाम करते. एकीकडे, दुसऱ्या तिमाहीतील ही सुखद आकडेवारी प्रकाशित होत असतानाच पायाभूत उद्योगांमधील वाढीचे ऑक्टोबर अखेरचे आकडेही प्रकाशित झाले आहेत. कोळसा, पोलाद, सिमेंट, वीजनिर्मिती, कच्चे तेल, नैसर्गिक वायू, तेल शुद्धीकरण आणि खते या प्रमुख आठ पायाभूत उद्योगांमध्ये गेल्या वर्षीच्या याच




काळाच्या तुलनेत भरीव वाढ झाली आहे. त्यातही सिमेंट, कोळसा आणि वीजनिर्मितीने तर चमकदार कामगिरी केली आहे.देशाच्या सगळ्याच औद्योगिक व इतर प्रगतीसाठी या तीनही बाबी मोलाच्या असतात. हे आर्थिक वर्ष आणि लोकसभेची मुदत मागेपुढेच संपणार आहे. त्यामुळे, या अर्थचित्राला राजकीय अर्थही आहे. या आकड्यांमध्ये काळजी करायला लावणारा आकडा आहे तो शेती क्षेत्राचा. शेती क्षेत्राने फार चमकदार कामगिरी केलेली नाही. तिसऱ्या तिमाहीचे आकडे पुढे जाहीर होतील, तेव्हा सध्याच्या कृषी संकटाचे प्रतिबिंब त्यात पडलेले दिसेल. एकूण जीडीपीमधील शेतीचा वाटा जसा महत्त्वाचा आहे, त्याचप्रमाणे या क्षेत्रातील रोजगारही प्रचंड आहेत. दुष्काळी स्थितीचा किंवा अवकाळी पावसाचा थेट परिणाम कृषी क्षेत्रावर आणि त्याच अनुषंगाने साऱ्या अर्थकारणावर होतो. या आर्थिक वर्षातले आता चार महिने उरले आहेत. या एकूण वर्षाची एकंदर कामगिरी चांगली असेल, असे दिसते. मात्र, या अर्थचित्रात शेती व शेतकरी दुर्लक्षित राहता कामा नये. केंद्र सरकार या दृष्टीने विचार करील, अशी अपेक्षा आहे.

# जलमेव यस्य, बलमेव तस्य

'जलमेव यस्य बलमेव तस्य' अर्थात् ज्याचे सागरावर अधिराज्य, तोच बलवान. ही उक्ती छत्रपती शिवाजी महाराजांनी जाणली व त्यामुळेच इंग्रजांचा धोका ओळखून आरमार मजबूत करण्याचे व विविध सामरिक वैशिष्ट्ये असलेले जलदुर्ग बांधण्याचे मनावर घेतले. शिवरायांच्या दूरदृष्टीचे दर्शन घडविणाऱ्या सिंधुदुर्ग किल्ल्यावरच यंदा भारताचा नौदल दिन साजरा झाला, हे औचित्यपूर्ण ठरले. आता सर्व दलांचे स्थापना दिन पंतप्रधानांच्या पुढाकारामुळे दिल्लीच्या बाहेर साजरे होऊ लागले आहेत. यंदा प्रथमच १५ जानेवारीस लष्कराचा स्थापना दिन बेंगळुरूमध्ये झाला.ऑक्टोबरमधील हवाई दल दिन सोहळा उत्तर प्रदेशात प्रयागराज येथे पार पडला. या नव्या प्रथेस धरून नौदलाने कोकण किनारपट्टीची निवड केली, ही स्वागतार्ह गोष्ट आहे. कोकणकिनारी नौदल वाद्यवृंदाचे सूर घुमले आणि युद्धनौका अवतरल्या. या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रथमच कोकणदौरा केला. शिवरायांची मुद्रा नौदलध्वजाबरोबर आता वर्दीवरचेही मानचिन्ह होईल तसेच नौदलातील सर्व पदनामे यापुढे भारतीय पारंपरिक अभिधानांत येतील, अशी घोषणा पंतप्रधानांनी केली. 'जलमेव यस्य, बलमेव तस्य' या वचनाचाही त्यांनी शिवरायांचा संदर्भ देऊन खास उल्लेख केला. पंतप्रधान मोदी यांच्यासहित संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या संरक्षणविषयक दूरदृष्टीचा जो मुक्तकंठाने गौरव केला; तो भारतीय नौदलाच्या पाठीशी किती मोठा, उज्ज्वल वारसा उभा आहे, हे दाखवून देणारा होता.या दिमाखदार समारंभात ताज्या विजयी पताकांची प्रभावळ मोदींच्या पाठीशी असल्याने सागरतीरावरची हवाही उत्साहावर स्वार होती. मालवणमधील या नौदल दिनाला विशेष औचित्य होते. नौदलाचा सर्वांत मोठा सक्रिय व आव्हानांच्या दृष्टीने संवेदनशील तळ म्हणजे पश्चिम नौदल कमांड. या कमांडचे मुख्यालय मुंबईच्या गोदीत व कुलाबा-नेव्ही नगर परिसरात आहे. परंतु महाराष्ट्रात आजवर मुंबईबाहेर किंवा अगदी काटेकोर बोलायचे तर नेव्ही नगर-कुलाब्याच्या बाहेर नौदलाचे अस्तित्व अधोरेखित व्हायचे नाही. मुंबईत शेअर बाजारपासून इतर वित्तीय केंद्रे व पर्यटनासाठी इतकी प्रेक्षणीय स्थळे असताना नौदल सामर्थ्याची झलक दाखविणारे बारमाही केंद्र कुठे नाही. जी संग्रहालये आहेत, ती सुरक्षेपायी कडीकुलूपात. छत्रपती शिवाजी महाराज, सरखेल कान्होजी आंग्रे यांच्यापासून चालत आलेला मराठा आरमाराचा वारसा असो की १९७१ च्या युद्धातील भारतीय नौदलाच्या देदीप्यमान कामगिरीचा इतिहास किंवा आधुनिक नौदलाची जडणघडण, यांची प्रेरणास्थाने महाराष्ट्रात नाहीत. काही गोष्टी प्रतीकात्मक असतात खऱ्या, परंतु त्यातून समाजाची दिशा, शिस्त, पोत स्पष्ट होते. इथे राजकीय नेतृत्व व जनमानसाचा रेटा कमी पडला. कोकणी लोकप्रतिनिधींनी तरुणांमध्ये सागरी महत्त्वाकांक्षेचे बीज पेरणे आवश्यक होते. ते झाले नाही. काही जलदुर्गांची मालकी खासगी असल्याने त्यांची विक्री करण्याचे प्रयत्नही झाले. महाराष्ट्रात भूखंड व्यवहारांचे वजन इतके मोठे असते की, त्यापुढे वास्तुवारसा संवर्धन, इतिहास, संरक्षण प्रणाली यांचे काही मोल नसते. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग अजून



अस्तित्व टिकवून आहेत, हीच काय ती जमेची बाजू.महाराष्ट्रातील जनतेचे दुर्गप्रेम अफाट आहे. नौदलातील युद्धनौका म्हणजे तरंगते दुर्गच. परंतु त्याकडे तरुणांना आकर्षित करण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतात. नौदलाने स्वदेशी नौकाबांधणीचा एक उत्तम धडा घालून दिला आहे. स्वदेशी बांधणीत अनेक लघू, मध्यम उद्योगांना काम मिळते. आपली पारंपरिक नौकाबांधणीतील कारागिरी युद्धनौकांच्या अचूकतेच्या मापदंडांत सिद्ध करण्याचीही संधी असेल. ज्या छोट्या अटकाव नौकेचे कप्तानपद आता एक मराठी महिला अधिकारी भूषविणार आहे, तशा नौकांच्या बांधणीपासून देशी उद्योगांची सुरुवात होऊ शकते. स्वयंपूर्णतेतील हा टक्का वाढून सेन्सर्स, क्षेपणास्त्रे, पाणतीर यांची निर्मितीही व्हायला हवी. त्यासाठी महाराष्ट्रात सागराशी निगडीत परिसंस्था उभी राहायला हवी. दोन दशकांपूर्वीपर्यंत नौदलाचे आव्हान पाकिस्तानपुरते सीमित होते. आता मात्र चिनी आव्हान पूर्ण हिंदी महासागरात पसरले आहे. अरबी समुद्रापर्यंत त्यांच्या पाणबुड्यांचा संचार वाढला आहे. पश्चिमेकडून अंमली पदार्थांची तस्करी उग्र रूप धारण करत आहे. वेळोवेळी विपुल मदत करूनही मालदीवला आपण नकोसे होत आहोत. या सर्व भूराजकीय बदलांमधून आव्हाने वाढत आहेत. समुद्री अर्थव्यवस्था हाही एक व्यापक विषय आहे. आज तरी भारताची ९५ टक्के व्यापारवाहतूक सागरी मार्गानेच होते. हे सागरी व्यापारीमार्ग सुरक्षित ठेवणे, हे कायमचे आव्हान आहे. अशा वेळी किनारी जनतेत संरक्षणाचे भान कायमचे जागृत ठेवणे गरजेचे आहे. नौदल दिनासारखे राष्ट्रीय सोहळे ग्रामीण भागात होतात, तेव्हा त्या परिसराचे रूप पालटून जाते. हे नवे रूप कायमचे टिकायला हवे. कवायतींचे दर्शन रोमहर्षक तर खरेच; परंतु त्यांतील जिद्द, धाडस आणि शिस्त यांचेही धडे स्मरणीय आणि अनुकरणीय ठरावेत.

# विसापूर मध्ये श्री संताजी जगनाडे महाराज ३९९ वी जयंती महोत्सव

## तेली समाजाने हक्कासाठी सामूहिक लढा द्यावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे थोर संत, तेली समाजाचे आराध्य दैवत श्री. संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांचा ३९९ वी जयंतीचा महोत्सव विसापूरमध्ये तेली समाज बांधवांच्या वतीने उत्साहाने साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात सर्वप्रथम शकुंतला इटनकर व बहिणाबाई गिरडकर यांच्या हस्ते घटस्थापना करून ढोल पथक रॅली काढून गावातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पमाला अर्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे उदघाटन गुरुदास गिरडकर, प्रमुख पाहुणे शालिनी आंबटकर प्रभारी प्राचार्य, राष्ट्रीय शारीरिक शिक्षण महाविद्यालय विसापूर व अमृता बावनकुळे, शेवंता बावणे, मिता गिरडकर याच्या शुभहस्ते करून जगनाडे महाराज यांच्या जीवनावर आधारित मार्गदर्शन करण्यात आले.

याप्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रमात संतांचे योगदान विषयावर भाषण स्पर्धा, शिक्षणाचे महत्व विषयावर निबंध स्पर्धा व ५ ते १३ वर्ष वयोगटात नृत्य स्पर्धा घेण्यात आली. सांस्कृतिक कार्यक्रमात पर्यवेक्षिका



म्हणून पंचशीला पाटील , प्रतिभा आवारी , विभा वैरागडे उपस्थित होते. तसेच जयंतीनिमित्त सामाजिक दायित्व जोपासून मातोश्री वृद्धाश्रम विसापूर येथे तेली समाज तर्फे फळ, बिस्कीट व नास्त्याचे वितरण करण्यात आले.श्री. संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्या जयंती महोत्सवात अध्यक्षस्थानी नरेंद्र इटनकर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून यश बांगडे सिनेट सदस्य गोंडवाना विद्यापीठ, नरेश भोवरे वनपरिक्षेत्र अधिकारी बल्लारपूर, चंदाताई वैरागडे अध्यक्ष चंद्रपूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी, आशिष देवतळे कार्याध्यक्ष प्रा.तैलिक महासभा चंद्रपूर तसेच प्रमुख अतिथी म्हणून दिनेश वरघणे मुख्याध्यापक जि.प.हायस्कूल विसापूर उपस्थित होते. या प्रसंगी उपस्थित पाहुण्यांनी समाजबांधवांना जगनाडे महाराज यांच्या जीवन कार्यावर भर देऊन समाजाला नवी ऊर्जा देण्याच्या दृष्टीने प्रबोधनात्मक मार्गदर्शन केले. समाजातील तरुणांनी संताजी जगनाडे महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून पुढील वाटचाल करावी असा संदेश अंगीकृत करण्याच्या संकल्प या जयंतीच्या महोत्सव प्रसंगी घेण्यात आला व समाजाला संघटित करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेऊन समाजाला सर्वांगीण विकासामध्ये पुढे नेण्याचे प्रभावी मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व सांस्कृतिक कार्यक्रमाचे बक्षिस वितरण करण्यात आले.याप्रसंगी ग्रा.पं. सदस्य गजानन पाटणकर, ग्रा.पं.सदस्या सरोज केकती, माजी सरपंच बंडुजी गिरडकर, तेली समाज उपाध्यक्ष दिनकर गिरडकर, सचिव अक्षय देशमुख, कोषाध्यक्ष नंदकिशोर गिरडकर, सहसचिव संतोष वैरागडे, संचालक रामदास हरणे, विजय गिरडकर, शंकर गिरडकर, अरुण बावणे, अशोक गिरडकर, विलास गिरडकर, विनोद गिरडकर, गजानन बावनकुडे, प्रफुल पोहाणे, प्रितम पाटणकर, तेली समाज युवा कार्यक्रम नियोजन समिती सदस्य, तेली समाज युवती मंच व सर्व तेली समाजबांधव उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अक्षय देशमुख, संचालन श्रद्धा साखरकर व आभार साखरकर यांनी मानले.

# न्याय हक्कासाठी अंगणवाडी सेविका, मदतनीस गोंडपिपरीत बेमुदत संपावर

## १५ तारखेला धडकनार नागपुरात मोर्चा

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समिती गोंडपिपरीच्या वतीने विविध मागण्या घेत गोंडपिपरी बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय येथे दि ८ (शुक्रवारी) १४२ अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी ठिय्या आंदोलन करून मागण्याचे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना तहसिलदार शुभम बहाकर,प्रकल्प अधिकारी शरद पारखी यांच्या मार्फत पाठविण्यात आले.

दुष्काळसदृश्य तालुक्यात असलेल्या अंगणवाडीच्या माध्यमातून कुपोषित बालके व गरोदर महिला यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहार याच्यावर या संपाचा परिणाम जाणवला आहे.अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी त्यांच्या प्रश्न सोडवावेत यासाठी प्रशासनाला नोव्हेंबर महिन्यात निवेदन दिले होते. परंतु त्यांच्या मागण्यावर कोणताही निर्णय न झाल्याने चार डिसेंबर पासून त्यांनी बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला तत्पूर्वी त्यांनी मोर्चा काढून निवेदन दिले.या निवेदनामध्ये



त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या आपिला मधील २५ एप्रिल रोजी ग्रॅच्युईटीबाबत दिलेल्या अंतिम निकालाची अंमलबजावणी करावी.शासकीय कर्मचारी घोषित करून त्या अनुषंगाने येणारे वेतनश्रेणी,ग्रॅच्युईटी,भविष्य निर्वाह निधी आदी सामाजिक सुरक्षा लाभ देण्यात यावेत.अंगणवाडी सेविका व मदतनिसांना ताबडतोब भरीव मानधनवाढ जाहीर करावी. मदतनीस व सेविकांचे मानधन किमान १८ ते २६ हजारापर्यंत करावे.मानधन महागाई निर्देशांकाला जोडून दर सहा महिन्यांनी त्यात निर्देशांकानुसार वाढ करावी.अंगणवाड्यांसाठी किमान रु ५००० ते ८००० भाडे मंजूर करावे. आहाराचा ८ रुपये दर अत्यल्प असून त्यामुळे कुपोषण निर्मूलन होण्याऐवजी उलट त्यात वाढ होत आहे तरी हा दर सर्वसाधारण बालकांसाठी १६ व अतिकुपोषित बालकांसाठी २४ रुपये असा करावा. या मागण्या केल्या.दि १५ नागपुरात ठीय्या आंदोलन करनार असल्याची माहिती मंगला झाडे, मालंद धाबरडे,इंदिरा चणकापूरे,दिपाली मुंजनकर,प्रतिभा रामटेके,कुसुम खामनकर,मंदा चौधरी, अंजना झाड़े यांनी सांगितले.

# नागलोन येथील तंटामुक्ती अध्यक्ष चेतन ढवस यांचा शिवसेनेत प्रवेश

## जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात बांधले शिवबंधन



**भद्रावती । प्रतिनिधी**

तालुक्यातील नागलोन येथील सामाजिक कार्यकर्ते तथा तंटामुक्ती अध्यक्ष चेतन ढवस यांनी युवासेना विधानसभा समन्वयक निखिल मांडवकर यांच्या सहकार्याने जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात शिवबंधन बांधून कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश घेतला आहे.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या धर्तीवर पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या मार्गदर्शनात अनेक सामाजिक उपक्रम राबविल्या जात आहे. त्यांच्या कार्याला प्रेरित होऊन अनेक नवतरुण पक्षात प्रवेश घेत आहे. यामध्ये तालुक्यातील नागलोन येथील सामाजिक कार्यकर्ते तथा तंटामुक्ती अध्यक्ष चेतन ढवस यांच्यासह कार्यकर्त्यांनी युवासेना विधासभा समन्वयक निखिल मांडवकर यांच्या सहकार्याने जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात शिवबंधन बांधून शिवसेनेत प्रवेश घेतला.यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख मनीष जेठाणी, युवासेना जिल्हा समन्वयक तथा माजी नगरसेवक दिनेश यादव, जेष्ठ शिवसैनिक चिंतामणी मांडवकर व आदी शिवसैनिक उपस्थित होते.

## काँग्रेस तळागळातील जनतेसोबत : दिनेश दादापाटील चोखारे

# इटोली येथे काँग्रेस नेत्या खा.सोनिया गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त शिलाई मशीन आणि नोट–बुक वाटप

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

काँग्रेसने नेहमी गरिबांना साथ दिली आहे. विविध योजना त्यांचेसाठी चालू केल्या व त्या आजही सुरु आहे. त्या योजनांचा लाभ सर्वांना होत आहे. कॉंग्रेसचा हात गरिबांसोबत तसेच तळागळातील जनतेसोबत असल्याचे प्रतिपादन काँग्रेसचे नेते कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दिनेश चोखारे यांनी केले.काँग्रेस नेत्या खा. सोनिया गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त इटोली येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत शिलाई मशीन आणि नोट–बुक वाटप कार्यक्रमात उद्धघाटक म्हणून ते बोलत होते.

या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा काँग्रेस कमिटी चंद्रपूरचे उपाध्यक्ष दिनेश दादापाटील चोखारे यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी ग्रामीण तालुका अध्यक्ष बल्लारपूरचे गोविदा पाटील उपरे यांचेसह ओबीसी नेते सचिन राजूरकर, इटोलीचे सरपंच तुळशीराम पिपरे, कटवलीचे सरपंच राजू ढुमणे, उपसरपंच नरेश बुरांडे, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका पुष्पलता दरेकर, शाळा समितीचे अध्यक्ष नागेश दुधबडे,



माजी सरपंच वासुदेव येरगुडे, धाडुजी दुधबडे, सदस्य दयालवार, आदी मान्यवरांची उपस्थिती होती.पुढे बोलताना चोखारे म्हणाले कि, सदर कार्यक्रमाचे माध्यमातून गरजू पर्यंत पोहचने व गोरगरीबाना वेळोवेळी साथ देणे हाच मुख्य हेतू ठेऊन काँग्रेस समोर जात आहे. आपण काँगेस सोबत उभे राहावे, आम्ही सदैव आपल्या सोबत असून कॉंग्रेसचा हात गरिबांसोबत आहे . यासमोर गावातील विकासाला चालना देऊ. शाळेतील सोयीसुविधेसाठी सर्वोतोपरी प्रयन्त करू, येत्या काळात प्रशिक्षण कार्यक्रम राबवू त्यामाध्यमातून इतराना प्रशिक्षण मिळेल. असे ते म्हणाले.या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांना बुक वाटप करण्यात आले.तसेच इटोलीसह बल्लारपूर तालुक्यातील १५ – २० गरजू महिलांना शिलाई मशीन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. यातसुनीता विजय वाळके, संतोषी माता वॉर्ड, बल्लारपूर, अर्चना गजानन रेनकूटवार रा. कळमना बल्लारपूर,चंदा सुधाकर घोंडे रा. पळसगाव बल्लारपूर, मंजू रामचंद्र वासमवार वॉर्ड ना. ०४, नया वस्ती, कोठारी , अर्चना देविदास गडकर रा. काटवली , बल्लारपूर, प्रभा रुंभी उपरे रा. कवडजाई बल्लारपूर , छाया राजू कुनघाडकर, रा. मानोरा बल्लारपूर, सविता सतीश चलाक रा. इटोली बल्लारपूर, वनिता अविनाश पेंदोर रा. मोहाली तुकूम बल्लारपूर, सुवर्णा रामू मरस्कोल्हे रा. किन्ही बल्लारपूर, पूजा प्रशांत (मुन्ना) गेडाम रा. कोर्टीमक्ता बल्लारपूर, ज्योत्सना संजय गोंधळी रा. बामणी बल्लारपूर,पुष्पा मारोती काळे रा. आमडी , बल्लारपूर, मनीषा अतुल सोनटक्के रा. नवी दहेली बल्लारपूर, वर्षा राजू गजभिये रा. जुनी वस्ती, कला मंदिर बल्लारपूर या गरजू महिलांचा सहभाग आहे.या कार्यक्रमात बल्लारपूर तालुक्यातील काँग्रेसचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेचे शिक्षक चिंद्यालवर यांनी केले.

# परीक्षेच्या काळात शारीरिक,मानसिक ताणावर मिळवा विजय

**सोलापूर :** डिसेंबर संपला की जानेवारीपासून इयत्ता दहावी- बारावीच्या बोर्ड परीक्षेची तयारी सुरू होते. अभ्यासक्रम आता अंतिम टप्प्यात असून विद्यार्थ्यांच्या सराव परीक्षा सुरू झाल्या आहेत. शिक्षकांकडूनही विषयनिहाय परीक्षेच्यादृष्टीने तयारी सुरू झाली आहे. पण, विद्यार्थ्यांनी परीक्षेचा ताण न घेता पहिल्यांदा स्वत:चे शारीरिक व मानसिक आरोग्य तंदुरुस्त ठेवण्याला प्राधान्य द्यायला हवे. पाठांतरापेक्षा नोट्स काढून त्याचा अभ्यास केल्यास निश्चितपणे गुण वाढतील, असा विश्वास शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.दहावी- बारावीच्या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा टर्निंग पॉइंटच. बोर्डातील गुणांच्या टक्केवारीवरून त्यांच्या भविष्याची वाटचाल निश्चित होते. त्यामुळे पालकांसोबतच विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेबद्दल भीती व चिंता राहते. बोर्डाच्या परीक्षा काळात विद्यार्थ्यांनी अभ्यासाचा ताण न घेता आत्मविश्वासाने शारीरिक व मानसिक स्थिती तथा आरोग्य तंदुरुस्त ठेवण्याला प्राधान्य द्यायला हवे. पालकांनी मुलांच्या परीक्षा सुरू असताना घरात सकारात्मक वातावरण राहील, याकडे अवश्य लक्ष द्यावे. या काळात घरात अजिबात वादविवाद होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. विद्यार्थ्यांना नकारात्मक बोलून त्यांचा आत्मविश्वास कमी करण्याचा प्रयत्न न करता त्यांना प्रोत्साहन द्यावे, असेही शिक्षणतज्ज्ञ सांगतात.दहावी- बारावीच्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी सात्त्विक आहार, पुरेशी झोप घ्यायला हवी. कुटुंबातील वातावरण सकारात्मक हवे आणि प्रत्येक तासाच्या अभ्यासानंतर काही मिनिटांची विश्रांती घेऊन पुन्हा अभ्यासाला बसावे. शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीवरच यश-अपयश अवलंबून असते.इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची बोर्डाची परीक्षा १ मार्चपासून सुरू होणार आहे. १ मार्च ते २६ मार्च या काळात दहावीची परीक्षा संपणार आहे. तत्पूर्वी, फेब्रुवारी महिन्यात त्यांची प्रात्यक्षिक पार पडणार आहे. विशेष बाब म्हणजे दहावीच्या विद्यार्थ्यांचे भाषा विषयांचे पेपर झाल्यानंतर पुढील विषयांच्या प्रत्येक पेपरसाठी एक ते दोन दिवसाचे अंतर ठेवण्यात आले आहे. विद्यार्थ्यांवर अभ्यासाचा ताण पडायला नको म्हणून बोर्डाने त्यादृष्टीने वेळापत्रक तयार केले आहे.इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांची बोर्डाची परीक्षा २१ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. २१ फेब्रुवारी ते १९ मार्चपर्यंत बारावीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा चालणार आहे. त्यात कला, वाणिज्य, विज्ञान, व्यावसायिक शिक्षण अशा शाखांच्या परीक्षांचा समावेश आहे. विशेष बाब म्हणजे बोर्डाच्या वेळापत्रकानुसार २१ फेब्रुवारीला इंग्रजी, २२ फेब्रुवारीला हिंदी, २३ फेब्रुवारीला मराठीचा पेपर होणार आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी पुढील प्रत्येक दोन पेपरमध्ये एक दिवसाचे अंतर ठेवण्यात आले आहे.प्रत्येक तासाच्या अभ्यासानंतर पाच ते दहा मिनिटांची विश्रांती घ्यावी. सलग अभ्यास फारसा लक्षात राहत नाही. परीक्षा काळात मोबाईलचा वापर टाळावा.बॅलन्स डायट हवे, बाहेरील काही न खाता घरातील पदार्थ खावेत, जेणेकरून आजारी पडणार नाहीत. (सात्त्विक व पौष्टिक आहार हवा), पाणी भरपूर प्यावे.रात्री साडेदहापर्यंत झोपावे आणि पहाटे साडेपाच वाजता उठून अभ्यास केल्यास स्मरणशक्ती चांगली राहते. दररोज किमान सात ते आठ तासांची झोप हवी.

# नवभारताची संकल्पना पूर्ण करणारा नमो महा रोजगार मेळावा–उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## राज्यस्तरीय नमो महारोजगार मेळाव्याचे थाटात उद्घाटन;हजारो उमेदवारांना नियुक्ती मिळण्याची शक्यता

**नागपूर । प्रतिनिधी**

नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या परिसरात होत असलेला आजचा नमो महारोजगार मेळावा जागतिक दर्जाचा आहे. हा मेळावा रोजगार देणारे आणि घेणारे यांचे संयुक्त व्यासपीठ असून बेरोजगारी मुक्त नवभारताची संकल्पना पूर्ण करणारा हा मेळावा असल्याचे प्रतिपादनउपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज(०९ )येथे केले.राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत ९ व १० डिसेंबर या कालावधीत राज्यस्तरीय नमो महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्याचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. सकाळी ११ वाजता या मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले.

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार प्रवीण दटके, प्रसाद लाड, अभिमन्यू पवार, विकास कुंभारे, आशिष जायस्वाल, मोहन मते, कृष्णा खोपडे, विभागाचे अप्पर मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, विभागाचे आयुक्त डॉ. रामास्वामी एन., विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, महानगर पालिकेचे आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा, टेक महिंद्रा कंपनीचे वरिष्ठ उपाध्यक्ष निखील अलुरकर यावेळी उपस्थित होते.या मेळाव्यासाठी ६० हजार तरूणांनी नोंदणी केली होती. ७९८ आस्थापना या ठिकाणी मुलाखतीसाठी आल्या आहेत. ४८ हजार ५४१ उपलब्ध जागांसाठी ही भरती होणार आहे. यासाठी विद्यापीठ परिसरात तीन मोठी दालने उभारण्यात आली आहे. उद्यापर्यंत हजारो





उमेदवारांना विविध आस्थापनामध्ये नियुक्ती दिली जाण्याची शक्यता आहे.या मेळाव्याला ऐतिहासिक आणि विक्रमी संबोधतांना उपमुख्यमंत्र्यांनी विविध आस्थापनांमध्ये त्यांचे वेगळेपण आपल्या भाषणात मांडले. केवळ मुलाखती घेऊन हा मेळावा संपणार नसून नोंदणी करण्यात आलेल्या प्रत्येक सुशिक्षीत बेरोजगारांच्या नोकरीबाबत पाठपुरावा करणारी यंत्रणा आम्ही उभारली आहे. त्यामुळे हा कार्यक्रम केवळ दोन दिवसांचा नाहीतर पुढेही अनेक दिवस चालणार आहे. मेळावा संपल्यानंतरही प्रत्येकाला संधी मिळेपर्यंत पाठपुरावा करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या आयोजनाचे कौतुक करतांना त्यांनी कौशल्य विकास विभागाने बदलत्या तंत्रज्ञानाला अनुसरून नव्या स्वरूपातील अभ्यासक्रम सुरू करावेत. रोजगार व प्रशिक्षण देण्याचे काम करावे अशी अपेक्षा व्यक्त केली.रोजगार निर्मिती, प्रशिक्षण व मागणीप्रमाणे मनुष्यबळाची उपलब्धता या संदर्भातील सर्व घटकांबाबत सर्वंकष धोरण ठरविण्यासाठी जागतिक बँकेसोबत रोजगार निर्मिती संदर्भात चर्चा सुरू आहे. इन्फोसिससारखा प्रकल्प २ हजार रोजगार देणार असल्याचे त्यांनी सांगितले.या मेळाव्यात विक्रमी संख्येने रोजगार मिळतील. मात्र, आम्ही इथेच थांबलो नसून राज्य शासनामार्फत १ लाख नोकऱ्या देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. या आयोजनासाठी काम करणाऱ्या कौशल्य विकास विभागाच्या विविध अधिकाऱ्यांचे कौतुक करतांनाच स्थानिक स्तरावर पाठबळ उभे करणाऱ्या शिवाणी दाणी व त्यांच्या चमुचे उपमुख्यमंत्र्यांनी कौतुक केले.केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी संबोधित केले. येणाऱ्या काळात मोठ्या प्रकल्पांमध्ये तरूणांना नोकऱ्यांची अधिक संधी असल्याचे त्यांनी सांगितले. मिहानसारख्या प्रकल्पात २ लक्ष सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगार मिळणार असल्याची माहिती त्यांनी दिली. पायाभुत सुविधांच्या वृध्दीसोबतच नोकऱ्याची संधी देशभरात वाढत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.शहरी भागातील तरुणांप्रमाणे ग्रामीण भागही रोजगाराच्या प्रवाहात यावा, यासाठी प्रयत्न होण्याची गरज आहे. शेतामध्ये युरियाच्या फवारणीसाठी ड्रोनचे तंत्रज्ञान वापरणे, बांबुपासून तयार होणाऱ्या व्हाईट कोळशाची निर्मिती आदी प्रयोग महाराष्ट्रातील लाखो तरुणांसाठी रोजगाराचे माध्यम ठरणार आहे. त्यामुळे शहरी भागासह ग्रामीण भागातही उद्योजकता निर्माण करण्यासाठी, तेथील तरुणांना रोजगार मिळवून देण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घ्यावा, असे आवाहन ना.गडकरी यांनी केले. तरुणांना रोजगार कसा मिळेल, यासाठी एका तज्ज्ञ समितीकडून अध्ययन करून घेत सविस्तर धोरण तयार करावे, अशी अपेक्षा ना . गडकरी यांनी राज्य सरकारकडे व्यक्त केली.कार्यक्रमाची भुमिका विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी मांडली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कल्पक्तेतून हा मेळावा नागपूर येथे साकारत आहे. बेरोजगारीमुक्त महाराष्ट्र करण्यासाठी आपला विभाग धडपड करीत आहे. त्यासाठीजागतिक दर्जाच्या अनेक कंपन्यांना राज्यस्तरीय या मेळाव्यामध्ये पाचारण करण्यात आले आहे. उद्या भरती प्रक्रियेचा विक्रम होईल, अशी आशाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.सुरूवातीला या विभागाचे अप्परमुख्य सचिव आशिष कुमार सिंह यांनी प्रास्ताविक व्यक्त केले. आभार प्रदर्शन विभागाचे आयुक्त डॉ. रामास्वामी एन यांनी केले. हजारोच्या संख्येने तरूणांनी या कार्यक्रमाला गर्दी केली होती. विद्यापीठाचा परिसर तरूणाईने भरून गेला होता. जागतिक दर्जाच्या अनेक कंपन्यांची उपलब्धता यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या असून उद्यापर्यंत बहुतेक आस्थापनांकडून नियुक्तीपत्र दिली जाणार आहे. उद्या(१०) सायंकाळी ५ वाजता समारोह होणार आहे.

**युवकांनी भेट देण्याचे आवाहन :**

**९ व १० दोन दिवस चालणाऱ्या या मेळाव्याला तरुणांनी भेट देण्याचे आवाहन मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले आहे. तिसऱ्या दालनात ६८ स्टार्ट अप कंपन्या या ठिकाणी आपले अनुभव सांगण्यासाठी उपलब्ध आहेत. विविध विषयांवरचे मार्गदर्शन सध्या दिवसभर सुरु आहे. याशिवाय टाटा, रिलायन्स, हिंदुस्थान लिव्हर, महिंद्र न्ड महिंद्र यासारख्या मोठ्या आस्थापनाकडून मुलाखती घेतल्या जात आह. हे प्रत्यक्ष युवक–युवतींनी बघावे, असे आवाहनही त्यांनी केले.**

### एकाच छताखाली रोजगाराची उपलब्धता...

# अनं अनेकांच्या चेहऱ्यावर हास्य हनमो महारोजगार मेळाव्यात सहभागी लाभार्थ्यांनी व्यक्त केल्या भावना

**नागपूर । प्रतिनिधी**

उद्योग व औद्योगिक क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज लक्षात घेता, केंद्र व राज्य शासनाने कौशल्य विकासाला विशेष प्राधान्य दिले आहे. नागपूर येथे आयोजित नमो महारोजगार मेळाव्याच्या माध्यमातून एकाच छताखाली शासनाने बेरोजगार युवक – युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली. या मेळाव्यात उपस्थित अनेक उद्योग आस्थापनांकडून अनेक तरुण – तरुणींच्या मुलाखती घेण्यात आल्या. मेळाव्याच्या माध्यमातून रोजगाराचा मार्ग सुकर झाल्यामुळे तरुण – तरुणींनी या मेळाव्याबद्दल समाधान व्यक्त केले. एवढेच नाही तर रोजगार प्राप्तीचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होता.

पीएम स्वनिधी योजनेचा महिलांना आधार :अनेकछोट्या व्यवसायिकांना पीएम स्वनिधी योजनेचा लाभ मिळाल्याने व्यवसायाला हातभार लागला तसेच कुटुंबाची आर्थिक परिस्थितीसुध्दा सुधारली, अशा भावना नागपूर येथे आयोजित नमो महारोजगार मेळाव्यामध्ये लाभार्थ्यांनी व्यक्त केली.पंचशिल नगर, नागपूर येथे राहणाऱ्या सुनंदा गडपायले (वय ५५) सांगत होत्या, घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे यापूर्वी मिळेल ती कामे करावी लागत असे. कापडाच्या दुकानात काम करून संसाराचा गाडा कसातरी चालत होता. त्यातच वाढत्या महागाई काळात घरखर्च चालविणे कठीण होत होते. दोन मुलींच्या शिक्षणाचाही भार. त्यामुळे स्वाभाविकच शिक्षणासाठी पैसे अपूरे पडायचे. यासाठी मग काही घरी स्वयंपाकाचे काम सुरू केले. यासाठी पंचशील नगर ते रामदासपेठ असा प्रवास करावा लागायचा. जाण्या – येण्याचा खर्च परवडत नव्हता. मात्र कुटुंबाच्या परिस्थितीमुळे पार्टटाईम म्हणून स्वयंपाकाचे काम करणे आवश्यकच होते. याच काळात मला पीएम स्वनिधी





योजनेची माहिती मिळाली. सुरवातीला योजनेचा माध्यमातून १० हजार रुपये कर्ज घेतले आणि मसाले तयार करण्याची मशीन खरेदी केली. यातून मसाला व्यवसाय सुरू केला. या व्यवसायातून महिन्याला ६ ते ७ हजार रुपयांचा आर्थिक मोबदला मिळू लागला. त्यामुळे घेतलेल्या कर्जाची परतफेड करणे शक्य झाले. प्रामाणिकपणे केलेल्या कर्जाची परतफेड व आर्थिक व्यवहार बघून बँकेने पुन्हा २०हजार रुपयांचे कर्ज मंजूर केले. यातून व्यवसायाला उभारी मिळाली. सद्यस्थितीत सुनंदा गडपायले 'मसाला' उद्योगात खीर मसाला, पाटवडी मसाला, बिर्याणी मसाला, मटन, चिकन, पनीर मसाला तयार तयार करतात. मसाला विक्रीसुध्दा त्या स्वत:च करतात. या विक्रीतून सुनंदा यांच्या हातात अतिरिक्त पैसे येत असून व्यवसायातून मिळालेल्या आर्थिक स्थैयामुळे त्या आपल्या दोन मुलींचे शिक्षण पूर्ण करीत आहे.

दीनदयाल अंत्योदय योजना अंतर्गत कचरा संकलन केंद्र : दीनदयाल अंत्योदय योजनेअंतर्गत महिलांना आत्मनिर्भर आणि व्यावसायिक बनविणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. संगिता रामटेके या सावित्रीबाई महिला बचत गट, धरमपेठ, झोन क्रमांक २ मध्ये मागील चार वर्षांपासून काम करीत आहेत. शहरात साठलेला कचरा गोळा करणे, ओला व सुका कचरा वेगवेगळा करणे, बेस्ट फ्रॉम वेस्ट यासंकल्पनेतून त्यावर प्रक्रिया करून पर्यावरणाचे रक्षण करणे हे या योजनेचे मुख्य उद्देश आहे.दीनदयालअंत्योदय योजना अंतर्गत संगिता रामटेके यांना २०१८ मध्ये हिरकणी महाराष्ट्राची हा प्रथम पुरस्कार मिळाला. तसेच जी –२० अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या वतीने इंदौर, दिल्ली येथेही त्यांनी अभ्यास दौरा केला. इंदोर येथे त्यांना स्वच्छता दूत पूरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघा तर्फे संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज जयंती साजरी



**वरोरा । प्रतिनिधी**

८ डिसेंबर रोज शुक्रवारला राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघाच्या वतीने हनुमान मंदीर वैष्णव नगर वरोरा येथे संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्या ३९९ व्या जयंतीचा कार्यक्रम घेण्यात आला.

सर्वप्रथम संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांचे प्रतीमेला माल्यार्पण करण्यात आले.सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्याम लेडे राज्याध्यक्ष राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघ हे होते. प्रमुख पाहुणे सुनिल बरिले अध्यक्ष राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघ वरोरा, अशोक टिपले उपाध्यक्ष राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघ वरोरा, भास्कर कुडे सचिव राष्ट्रीय ओबीसी महासंघ वरोरा प्रमुख वक्ते रामचंद्र सालेकर, अशोक सोनटक्के अध्यक्ष सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघ वरोरा, दिपक भोयर, अण्णाजी झाडे, वसंत राखुंडे, विजय कामतकर, सुधाकर खारकर, रामकृष्ण बोबडे, रामकृष्ण नीमसटकर यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रस्ताविकेत सुनिल बुरिले यांनी संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांचे जीवन कार्याबद्दल विस्तृत माहिती दिली.प्रमुख वक्ते रामचंद्र सालेकर यांनी सुद्धा महाराजांनी केलेल्या कार्याबद्दल माहिती सांगितली. भास्कर कुडे, श्याम लेडे यांनी महाराजांच्या संपुर्ण कार्याबद्दल माहिती सांगितली.कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन अशोक टिपले यांनी केले व आभार दिपक भोयर यांनी मानले.

# राष्ट्रीय लोक अदालतीत २ हजार ६७९ प्रकरणे निकाली

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या अध्यक्षा समृद्धी एस. भीष्म यांच्या मार्गदर्शनात (आज दि. ९ डिसेंबर) चंद्रपूर जिल्हा न्यायालय तसेच सर्व तालुक्यातील न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

या लोकन्यायालयाचे उद्घाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या अध्यक्षा समृद्धी भीष्म यांच्या हस्ते पार पडले. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी, जिल्हा न्यायाधीश अभिश्री देव, गिरीश भालचंद्र, पांडुरंग भोसले, भगवान फड, प्रशांत काळे आदी उपस्थित होते.



लोक न्यायालयासाठी चंद्रपूर मुख्यालयात ७ तसेच तालुका न्यायालयात २१ असे एकूण २८ पॅनल तयार करण्यात आले होते. या लोक न्यायालयामध्ये १० हजार ५५ प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे व १७ हजार ६८० दाखलपूर्व प्रकरणे अशी एकूण २७ हजार ७३५ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी १ हजार ३४२ प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तर १ हजार ३३७ दाखलपूर्व प्रकरणे अशी एकूण २ हजार ६७९ प्रकरणी निकाली काढण्यात आली. प्रलंबित प्रकरणांमध्ये मोटार वाहन अपघात नुकसान भरपाईत ९ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून नुकसान भरपाई रक्कम ७० लक्ष ८० हजार वसूल करण्यात आले. भूसंपादनाची एकूण १४ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून त्याबाबत ७१ लक्ष ६५ हजार ८५७ रुपये नुकसान भरपाई संबंधित पक्षकारास अदा करण्यात आली. कौटुंबिक वाद प्रकरणांपैकी ५ प्रकरणांमध्ये पक्षकारांनी तडजोडीअंती एकत्र राहण्याचा समजुतीने निर्णय घेतला. धनादेश अनादरीत प्रकरणांपैकी ६१ प्रकरणे ज्याची रक्कम रुपये ५३ लाख ५८ हजार ८१९ निकाली काढण्यात आली. लवाद वसुलीची २७ प्रकरणे निकाली काढण्यात आली ज्याची रक्कम रुपये १ कोटी ३८ लक्ष ७९ हजार १९२ वसूल करण्यात आली. औद्योगिक न्यायालयातील पाच प्रकरणे निकाली काढण्यात आली. जिल्ह्यातील सर्व न्यायालयात लोक अदालत यशस्वी होण्यासाठी सर्व न्यायाधीश, वकील, न्यायालयीन कर्मचारी तसेच पोलीस कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले, असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी यांनी कळविले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .